2018-19

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019 Special Issue- 90 (B)

# महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता



मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर**

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2019 Special Issue – 90 (B)

## महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi),
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 700/-

ISSN : 2348-71
January-


## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Mara**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi A**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalga
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.]**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.]**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, Ind**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik R
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahad
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.


**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Facto. - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक /लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | विद्यार्थ्यांना परीक्षेमुळे येणाऱ्या ताण – तणावांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी योगा एक प्रभावी उपाय | प्रा.जय सोने | 06 |
| 2 | महाराष्ट्रातील विभागनिहाय सिंचन निर्मिती व अनुशेष | प्रा.प्रविण कुलकर्णी | 08 |
| 3 | महाराष्ट्रातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचे बदलते स्वरूप – एक अभ्यास | प्रा.मेघा पाटोळे | 11 |
| 4 | महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – एक मंथन | प्रा. हरिहर मोहोकार | 15 |
| 5 | महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळ – एक आर्थिक दृष्टीकोन | ज्योती महाजन | 19 |
| 6 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल आणि सामाजिक – आर्थिक विकास | डॉ.क्रांती बोरावके | 23 |
| 7 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | प्रा.विजय तोंडारे | 29 |
| 8 | महाराष्ट्रातील सिंचन योजनांवरील खर्च प्रवृत्तीचे विश्लेषण | डॉ.प्रशांत देशमुख | 32 |
| 9 | महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात फुले दाम्पत्याचे योगदान | डॉ.उद्धव कांबळे | 37 |
| 10 | महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील जलसिंचनाचा अनुशेष | डॉ.विजय नागरे | 41 |
| 11 | महाराष्ट्राच्या विकासात लोकनेते शरद पवारांचे योगदान : एक दृष्टीक्षेप | डॉ.प्रभाकर जगताप | 49 |
| 12 | महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल कारणे आणि परिणाम | प्रा.प्रदीप केंद्रे | 53 |
| 13 | महाराष्ट्रातील कामगार चळवळ : ऐतिहासिक, सामाजिक ,राजकीय एक मागोवा | डॉ.रामदास निहाळ | 58 |
| 14 | मराठवाड्याचे मागासलेपण आणि धोरणांचा दुष्काळ | डॉ.श्रीकांत देशमुख | 61 |
| 15 | महाराष्ट्रातील राजकीय संस्कृती | प्रा.विशाल कुंभार | 64 |
| 16 | महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेतील महिला नेतृत्व : वास्तव आणि उपाय | डॉ.नंदकिशोर उगले व डॉ.क्रांती बोरावके व सहदेव रोडे | 67 |
| 17 | भारतीय लोकशाही : तत्त्व आणि व्यवहार | डॉ.पंडित नलावडे व डॉ.नंदकिशोर उगले | 72 |
| 18 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ : सहकारी साखर कारखाने -एक अवलोकन | डॉ.बाबासहेब देशमुख | 76 |
| 19 | महाराष्ट्रातील झोपडपट्टीवासीयांचे समाजजीवन आणि राजकारण | डॉ.बेग रेहानाआरा ईस्माइल | 79 |
| 20 | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ – आव्हाने व उपाय | डॉ.श्रीमती मीना पाटील | 84 |
| 21 | महाराष्ट्रातील आर्थिक विषमता आणि उपायांबाबत संक्षिप्त आढावा (२०१६ -१७) | डॉ.एम. जी. थोपटे | 88 |
| 22 | मराठवाड्यांचे आर्थिक मागासलेपण – एक आढावा | डॉ.बी.पी.गाडेकर | 93 |
| 23 | महाराष्ट्रातील प्रादेशिक भागातील ग्रामीण दारिद्र्याच्या विषमतेचा अभ्यास | प्रा.भगवान देशमुख | 100 |
| 24 | महाराष्ट्रातील कृषी भूमीउपयोजन : एक चिकित्सक अभ्यास | डॉ.सदाशिव मेंगाळ | 104 |
| 25 | महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात स्थानिक नेतृत्वाची भूमिका | डॉ.नंदकिशोर उगले, डॉ.कुमुदिनी जोगी | 109 |

ISSN : 2348-7143
January-2019

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - आव्हाने व उपाय

**डॉ. श्रीमती पाटील मिना फकीरा**
(अर्थशास्त्र विभाग)
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, मालेगाव (नाशिक)
मोबा. ७५८८७८३४००
mfp.sph@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतांच्या आर्थिक विकासात सहकार चळवळीचा मोठा सहभाग आहे. या चळवळीचा पाया महाराष्ट्रातून रुजलेला दिसतो. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार चळवळीचा मोठा वाटा आहे. भविष्यातही सहकार चळवळीतून विकास व वृध्दी होईल. परंतु सध्या महाराष्ट्रातील सहकार चळवळीत अनेक समस्या व आव्हाने निर्माण झाली आहेत. या समस्या सोडविल्या नाही तर सहकाराचा विकास कुंठित होईल. म्हणून महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा आढावा घेणे व त्यातून समस्यांचा अभ्यास करुन उपाय योजना करणे आवश्यक आहे. सहकार चळवळीतील समस्यांमुळे महाराष्ट्रात प्रादेशिक विषमता देखील निर्माण झालेली आहे. सहकार चळवळीतील समस्या दूर झाल्यास प्रादेशिक विषमता देखील दूर होवू शकते. प्रस्तुत शोधनिबंधात यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दीष्ट्ये :**

१. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या समस्यांचा अभ्यास करुन उपाय योजना सुचविणे.

१९०४ मध्ये पहिला सहकारी कायदा मंजुर झाला व सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी सहकारी संस्था निर्माण होऊन भारतामध्ये सहकारी चळवळीचा उगम झाला. कृषी सहकारी पत संस्था व पूरक व्यवसाय करणारे उदा., दुग्धपालन, कुक्कुटपालन, मेषपालन, वराहपालन, मत्स्यव्यवसाय अशा अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या. सहकारी चळवळीने औद्योगिक क्षेत्रातही प्रवेश करुन प्रक्रिया उद्योग निर्माण करण्याच्या उद्देशाने सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, सहकारी प्रक्रिया संस्था निर्माण करुन ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार प्राप्त करुन दिला. सहकारी चळवळीने शेतकऱ्यांना स्वाभिमानाने जीवन जगायला शिकवले आणि खेड्यांचा विकास केला. भारतीय अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीने महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे. नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्थांनी ग्रामीण व शहरी भागातील गरीब व मध्यमवर्गीयांना अर्थसहाय्य करुन त्यांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी मदत केली आहे व करीत आहे. भारतीय सहकारी चळवळीच्या वाटचालीला १०० वर्षे पूर्ण होऊन २००४ मध्ये शताब्दी साजरी केली आहे. वैकुंठभाई मेहता, भाऊसाहेब हिरे, धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, प्रा. डी. जी. कर्वे, यशवंतराव चव्हाण, वसंतराव पाटील या विभुतींनी सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी सहकार चळवळ राज्यात जाणीवपूर्वक रुजविली.

आज या चळवळीने वटवृक्षाचे रुप धारण केले आहे. राज्याच्या सर्वांगिण विकासात सहकारी चळवळीचा मोठा वाटा आहे. सहकारी चळवळीने भारतात हरित क्रांती, धवल क्रांती, औद्योगिक क्रांती घडविली, सहकार चळवळीचे हे यश निश्चितच सहकारातील निष्ठावान नेतृत्व, जाणकार सभासद तज्ञ अधिकारी व सहकारी चळवळीत नेहमीच सहकार्य करणारे महाराष्ट्र शासन यामुळे शक्य झालेले आहे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची भूमिका :**

महाराष्ट्रात सहकार चळवळीचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला असून भारतात महाराष्ट्रात सहकार चळवळीमुळे झालेला विकास पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा तुलनात्मक आढावा**

| अ. क्र. | तपशील | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लोकसंख्या | ३९५५४ | ५०४१२ | ६२७८४ | ७८९३७ | ९६८७१ | ११२३७४ | ११२३७४ |
| २ | राज्य उत्पन्न | २२४९ | ५७८० | ११३७७ | ६८८६१ | २४३५८४ | ९५०७७१ | ११८६८०६ |
| ३ | सहकार | २१४०० | २०४२० | १८५७७ | १९५६५ | २०५५१ | २१४५१ | २१०८९ |
| ४ | वीज वापर (मेगा वॅट) | ७५९ | १९०९ | ४०८८ | ८६८६ | १२७६९ | १८८५३ | ३५१६६६ |
| ५ | रस्ते | ५१८७८ | ६५३६४ | १४१३१ | १७२९६५ | २१६९४६ | २४१७१२ | ३०३३५९ |
| ६ | रोजगार | -- | ९९७७ | ११११२ | ११६८४ | १२००५ | १८१४६ | २५५४८ |
| ७ | मोटर वाहने | -- | ३११७६९ | ८०४९८६ | २६४०५८५ | ६६०७०६४ | १६९८९६५९ | २११८५८६८ |

**(संदर्भ - महाराष्ट्र राज्याची आर्थिक पहाणी, २०१०-११)**

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती :**

महाराष्ट्रात सहकार चळवळीची प्रगती वेगाने झालेली असली तरी ती समाधानकारक आहे काय ? चळवळीमध्ये अजुन प्रगती साधता येईल का ? चळवळीतील उणिवा शोधून त्या दूर कशा करता येतील ? खुल्या अर्थव्यवस्थेत शासनाच्या कुबड्यांवर चळवळ फार काळ तग धरु शकेल असे वाटत नाही. म्हणून चळवळी समोरील आव्हाने व त्यावर काय उपाययोजना करता येऊ शकतात यावर विचारमंथन होणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्रातील सहकार चळवळीची प्रगती**

**(सभासद लाख व रुपये कोटीत)**

| अ. क. | तपशील | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहकारी संस्था संख्या | ४२५९७ | ६०७४७ | १०१०२० | १५८०१६ | २२४३०६ | १९५३०१ |
| २ | सभासद संख्या | ८५८१ | १४७८३ | २६९०३ | ४३०२२ | ५३०२२ | ५२५०२ |
| ३ | खेळते भांडवल | १४८९ | ५२१० | २४२८४ | १३४४४० | २४८४३४ | ३६३८७८ |
| ४ | स्थुल कर्जे | १०९८ | २९३४ | १५१४८ | ७२०६७ | १००६८१ | १४००४४ |
| ५ | येणे कर्ज | ८८३ | २३११ | १२०६२ | ६७६५३ | १११८६२ | १४५७४२ |
| ६ | उलाढाल तयार मालाच्या विक्रीचे मुल्य | | ५३१ | २३५३ | ६६३८ | १३३३९ | २६२५८ |

**(संदर्भ - सहकार चळवळ - एक दृष्टीक्षेप, २०१७-१८)**

**सहकार चळवळीसमोरील आव्हाने**

१. जनाधाराचे पाठबळ वाढविणे हे सहकार चळवळीसमोरील आवाहन आहे.
२. सहकारी संस्था ह्या राजकारणाचे अड्डे बनले आहेत. त्यातून त्यांची सुटका करणे आवश्यक आहे.
३. सहकारी बँकांमध्ये जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आधुनिकता निर्माण करण्याचे आवाहन आहे.

४. गेल्या काही वर्षात सहकार चळवळीत दूरदृष्टी असलेल्या विधायक नेतृत्वाची कमतरता भासू लागली आहे.

५. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव, नव्या आर्थिक धोरणांमुळे निर्माण झालेली खुली स्पर्धात्मकता आणि गुणवत्तेला प्राधान्य देणारी, व्यापारी संरक्षण कमी करणारी, उदारमतवादी आर्थिक वातावरणाची परिस्थिती अशा काही विचित्र अवस्थेत सहकार चळवळ सापडली आहे.

६. वाढता सहकारी हस्तक्षेप आणि कायद्यातील तरतुदीमध्ये वारंवार बदल करुन सहकारी संस्थांवर नियंत्रणाचा फास आवळत त्याची स्वायत्तता संकुचित करण्याचा केलेला प्रयत्न, संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक विकासाकडे केलेले कमालीचे दुर्लक्ष, सहकारी क्षेत्रातील कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी यांच्या प्रशिक्षणाची अनास्था, सरकारी आश्रयाखाली रहाण्याची सवय व त्यामुळे आलेले अपंगत्व आणि भ्रष्टाचार, वशिलेबाजी, लालफित या अपप्रवृत्तीत झालेली वाढ या सर्वांचा परिणाम सहकार चळवळीवर दिशाहीन, कर्तृत्वहीन, आपली उद्दिष्ट्ये, लक्ष्य हरवलेली चळवळ म्हणून समाजापुढे येत आहे.

७. सहकारी चळवळीने सर्वच आर्थिक क्षेत्रात आपला ठसा उमटविण्याचा केविलवाणा प्रयत्न चालवला आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रात या संस्था अपयशी ठरल्या आहेत. सर्व आर्थिक क्षेत्रे व्यापण्याऐवजी संभवशक्ती असणारी विशिष्ट क्षेत्रे निवडून तेथे संस्थात्मक विकासावर भर दिल्यास वेळ, श्रम व आर्थिक साधनांनी बचत होईल व यशस्वी वाटचाल साध्य होईल. परंतु अशा संभाव्य स्थळाची निश्चिती करता येणे अशक्य आहे.

८. सहकारामध्ये भ्रष्टाचार मोठया प्रमाणात वाढला असल्याने दिवाळखोरीसारखी समस्या आहे. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास टिकविणे हे एक आवाहन आहे.

९. सहकार चळवळ हे तत्वज्ञान व लोकशिक्षणाची चळवळ आहे. सहकार चळवळ वाढविणाऱ्या नेत्यांनी सहकार चळवळीतील नैतिक मुल्यांच्या अधिष्ठानांला सर्वोच्च स्थान दिले. आजच्या सहकारी नेतृत्त्वाला नैतिक अधिष्ठान रुजविण्याचे आवाहन आहे.

**सहकार चळवळीवरील उपाय योजना :**

RESEARCH JOURNEY

१. सहकारी चळवळीचा वापर नियोजनबध्द रीतीने व्यावसायिक दृष्टिकोन समोर ठेवून आणि शास्त्रशुध्द व्यवस्थापनेच्या संकल्पनेचा स्विकार करुन केला गेल्यास, सहकारी संस्था सक्षम होण्यास वेळ लागणार नाही.

२. सहकार क्षेत्रातील मनुष्यबळाचा विकास करण्यासाठी काळानुसार शिक्षण, प्रशिक्षण सहकारी संस्थांमधील सभासद, कर्मचारी, संचालक, पदाधिकारी यांना द्यावे.

३. सहकारी पतसंस्थांनी शेती उत्पादनाबरोबर विपणन प्रक्रिया संस्था, ग्राहक सहकारी संस्था व लघुउद्योगांना पतपुरवठा करुन सबल केले तरच त्याही सबळ होतील.

४. सहकारी संस्थांनी आंतरिक क्षमता वाढवून व्यावसायिक व्यवस्थापनाची कास धरली पाहिजे.

५. वाजवी गरजा व प्रश्नांची जाणीव असलेल्या सामान्य संचालक मंडळाला तज्ञ, अनुभवी, कार्यक्षम व्यवस्थापनाची जोड मिळाली तरच सहकारी संस्थांना आपले भवितव्य उज्ज्वल करता येईल. सहकारी चळवळ आर्थिक निकोप, निर्दोष, अधिक दर्जेदार व अधिक लोकाभिमुख होणे ही काळाची गरज आहे.

६. सहकारी चळवळीसाठी दिर्घकालीन नियोजनबध्द कृती आराखडा बनविणे आवश्यक आहे.

७. सहकारी चळवळीचे वेळोवेळी मूल्यमापन करुन यशापयशाची कारणे शोधून दुरुस्तीसाठी पावले उचलणे आवश्यक आहे.

८. केंद्र शासनाच्या मॉचेल सहकारी कायद्याचे धर्तीवर राज्य शासनाचे स्वायत्त, स्वनियंत्रित, स्वयंअनुशासित सहकारी संस्थांचा कायदा करुन या संस्था खऱ्या अर्थाने सभासदांच्या संस्था, सभासदांसाठी काम करणाऱ्या व सभासदांचे नियंत्रण असलेल्या झाल्या पाहिजेत.

सहकारी चळवळीची व्याप्ती जप्तजशी वाढू लागली तसतसे नैतिक अधिष्ठान आणि मुल्यांची जपवणूक करणाऱ्या विचारांचा वारसा मागे पडून तेथे सत्ता व स्वार्थ यांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला. त्यामुळे प्रादेशिक विषमतेला जे खतपाणी मिळाले ते सहकाराच्या समस्या सोडविल्यास कमी होवू शकते.

**संदर्भ :**


१. तापकिर मुकुंद व साबळे आर. जे. सहकार, निराली प्रकाशन, पुणे
२. रायखेलकर - डांगे, सहकार - तत्त्वे व व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
३. कामत गो. स., सहकार तत्त्व, व्यवहार व व्यवस्थापन, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे.
४. Kumar N. A., Co-operation, Himalaya Publising House, Mumbai.
५. लोकमत सहकार विशेषांक.
६. अर्थ मीमांसा
७. अर्थ संवाद
८. योजना

Pune District Education Association's

# Anantrao Pawar College, Pirangut, Tal-Mulshi, Dist-Pune 412115

**(Arts, Commerce and Science)**

**NAAC Accredited 'A' Grade (First Cycle)**

Two day State Level Seminar on

## REGIONAL DISPARITY IN MAHARASHTRA

**$11^{th}$ & $12^{th}$ January 2019**

Sponsored By

**Savitribai Phule Pune University (BOD), Pune**

Organised by

**Department of Social Sciences**

**(Geography, Economics, History & Political Science)**

# *CERTIFICATE*

**This is to Certify that Prof./ Dr./ Mr./Ms.** Meena Patil

**of** Shrimati Pushpatai Hire Women College, Malegaon, Nashik. **has been participated/ Worked as Resource Person/ Chairperson presented a paper titled** « महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - आव्हाने व उपाय.

**in two days state level seminar on 'Regional Disparity in Maharashtra' held at PDEA's Anantrao Pawar College, Pirangut.**

| Dr. N. N. Ugale | Prof. S. G. Rode | Dr. K.S. Borawake | Dr. P. N. Patil | Prin. Dr. P. N. Shelke |
|---|---|---|---|---|
| | | (Coordinator) | | (Convener) |